आरबीआय/२०१२-१३/३१
डीएनबीएस.(पीडी) सीसी.क्र. २९३/०३.१०.३८/२०१२-१३ दि. जुलै २, २०१२

**सर्व एनबीएफसींना (आरएनबीसी सोडून).**

महोदय,

**महापरिपत्रक - एनबीएफसींच्या नव्या वर्गाची ओळख अबँकीय वित्तीय कंपन्या - मायक्रो वित्त संस्था (एनबीएफसी एमएफआय) निदेश.**

आपणास माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी भारतीय रिझर्व बँकेने अद्यावत केलेली परिपत्रके/अधिसूचना प्रसृत केल्या होत्या. जून ३०, २०१२ रोजी अद्यावत केलेल्या परिपत्रकातील सूचना खाली दिल्या आहेत. ही अद्यावत केलेली अधिसूचना आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आली आहे.

आपली
(सी. आर. संयुक्ता)
मुख्य महाव्यवस्थापक.

अनुक्रमणिका


| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| (१) | प्रस्तावना |
| (२) | प्रारंभिक |
| | (१)लघु शीर्षक व निदेशांची सुरुवात |
| | (२) निदेशांची व्याप्ती |
| | (३) एनबीएफची  एमएफआयची व्याख्या |
| | (४) एनबीएफसी  एमएफआयसाठी विनियामक साचा |
| | परिशिष्ट. |

## (१) प्रस्तावना

नाणेविषयक धोरणाच्या नोव्हेंबर २०१० मधील आढाव्यात निर्देश केल्याप्रमाणे, एमएफआय क्षेत्रातील प्रश्न व अडचणींचा अभ्यास करण्यासाठी, रिझर्व बँकेच्या केंद्रीय मंडळाची एक उपसमिती स्थापन करण्यात आली (अध्यक्ष - श्री वाय एच मालेगम) ह्या समितीने जानेवारी २०११ मध्ये तिचा अहवाल सादर केला. २०११-१२ च्या नाणेविषयक धोरण निवेदनामध्ये घोषित करण्यात आले की, ह्या समितीने शिफारस केलेल्या विनियमांच्या स्थूलमानाने केलेल्या साचाचा ह्या बँकेने स्वीकार केला आहे.

### (२) एनबीएफसी एमएफआय ह्या वेगळ्या वर्गाची निर्मिती

एनबीएफसींचा नवा वर्ग, म्हणजे अबँकीय वित्तीय कंपनी - मायक्रो वित्त संस्था (एनबीएफसी एमएफआय) निर्माण करण्याचे ठरविण्यात आले आहे. परिणामी, एनबीएफसींचे वर्ग/प्रकार पुढीलप्रमाणे असतील

(१) ॲसेट फायनान्स कंपनी (एएफसी)
(२) गुंतवणुक कंपनी (आयसी)
(३) कर्ज कंपनी (एलसी)
(४) इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपनी (आय एफसी)
(५) कोअर इनवेस्टमेंट कंपनी (सीआयसी)
(६) इन्फ्रास्ट्रक्चर डेट फंड - अबँकीय वित्तीय कंपनी (आयडीएफ एनबीएफसी)
(७) अबँकीय वित्तीय कंपनी - मायक्रो वित्त संस्था (एनबीएफसी एमएफआय).

(३) एनबीएफसी एमएफआयद्वारा विनियमांचे अनुपालन केले जाण्याबाबत देखरेख ठेवण्याबाबतची भूमिका घेण्यासाठी, ह्या उपसमितीने उद्योग-संघांना शिफारस केली आहे.

(४) एनबीएफसी एमएफआयसाठी विनियामक साचा असलेली अधिसूचना डीएनबीएस.पीडी.क्र. २३४ सीजीएम (युएस) २०११, दि. डिसेंबर ०२, २०११; अबँकीय वित्तीय (ठेवी न घेणा-या व न ठेवणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ मध्ये दुरुस्ती करणारी अधिसूचना डीएनबीएस.पीडी.क्र. २३५/सीजीएम (युए), २०११ दि. डिसेंबर ०२, २०११; आणि अबँकीय वित्तीय कंपन्या ऑडिटर्स रिपोर्ट (रिझर्व बँक) निदेश, २००८ मध्ये दुरुस्ती करणारी अधिसूचना डीएनबीएस.पीडी.क्र. २३६/सीजीएम (युएस), २०११ दि. डिसेंबर ०२, २०११ ह्या, काटेकोरपणे अनुपालन केले जाण्यासाठी देण्यात आल्या होत्या.

## (२) प्रारंभिक

### (१) लघु शीर्षक व ह्या निदेशांची सुरुवात

(१) ह्या निदेशांना, अबँकीय वित्तीय कंपनी - मायक्रो वित्त संस्था (रिझर्व बँक) निदेश, २०११ असे समजले जाईल.
(२) हे निदेश, डिसेंबर २, २०११ पासून जारी होतील.

**(२) ह्या निदेशांची व्याप्ती**

ह्या निदेशांमध्ये व्याख्या केलेल्या प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी - मायक्रो वित्त संस्थेला (एनबीएफसी एमएफआय) हे निदेश लागु होतील.

**(३) एनबीएफसी एमएफआयची व्याख्या**

पुढील अटी पूर्ण करणा-या, ठेवी न स्वीकारणा-या एनबीएफसीला (भारतीय कंपन्या अधिनियम, १९५६ च्या कलम २५ खाली नोंदणी केलेली कंपनी सोडून असलेल्या) एनबीएफसी एमएफआय असे म्हटले जाते

(१) किमान निव्वळ निजनिधी रु. ५ कोटी (भारताच्या ईशान्य प्रदेशात नोंदणी झालेल्या एनबीएफसी एमएफआयसाठी, किमान एनओए आवश्यकता रु. २ कोटी एवढी असेल)

(२) तिच्या निव्वळ ॲसेट्सच्या किमान ८५% असेट्स क्वालिफायिंग असेट्स ह्या स्वरुपाचे असतील.

वरील (२) साठी निव्वळ असेट्स म्हणजे, कॅश व बँक बॅलन्सेस व मनी मार्केट संलेख सोडून असलेले एकूण असेट्स.

क्वालिफायिंग असेट्स म्हणजे, पुढील निकष पूर्ण करणारे कर्ज

(अ) ग्रामीण घरामधील वार्षिक उत्पन्न रु. ६०,०००/- असलेल्या किंवा नागरी किंवा अर्ध नागरी क्षेत्रातील घरगुती वार्षिक उत्पन्न रु. १,२०,००० पेक्षा अधिक नसलेल्या कर्जदार एखाद्या एनबीएफसी एमएफआयने दिलेले कर्ज

(ब) कर्जाची रक्कम प्रथम चक्रात रु. ३५,०००/- व त्यानंतरच्या चक्रात रु. ५०,००० पेक्षा अधिक नाही

(क) कर्जदाराचा एकूण कर्जबाजारीपणा रु. ५०,००० पेक्षा अधिक नाही

(ड) दंडरहित परतफेडीसह, रु. १५,००० पेक्षा जास्त कर्ज-रकमेसाठी कर्ज मुदत २४ महिन्यांपेक्षा कमी ठेवलेली नाही

(ई) ते कर्ज तारणा वाचून देण्यात आले आहे

(फ) एमएफआयने दिलेल्या एकूण कर्जांच्या ७५% टक्के कर्जे उत्पन्न निर्माणासाठी दिलेली आहे.

(ग) ह्या कर्जाची परतफेड कर्जदाराच्या निवडीनुसार साप्ताहिक, पाक्षिक किंवा मासिक हप्त्यांनी केली जाणार आहे.

(३) ह्याशिवाय, ॲसेट्सच्या उर्वरित १५% पासून एनबीएफसी एमएफआयला मिळणारे उत्पन्न, ह्याबाबत विहित केलेल्या विनियमांनुसार असावे

(४) एनबीएफसी एमएफआय म्हणून निकष पूर्ण न करणा-या एनबीएफसीने, तिच्या एकूण ॲसेट्सच्या १०% अधिक रकमेची कर्जे मायक्रो वित्त क्षेत्राला देऊ नयेत.

**(४) एनबीएफसी-एमएफआयसाठी विनियामक साचा**

A. Entry Point Norm

वर सांगितल्याप्रमाणे, देशाचे ईशान्य क्षेत्र सोडल्यास नोंदणीसाठी इतर नवीन एनबीएफसी एमएफआयजवळ किमान निज निधी (एनओएफ) रु. ५ कोटी एवढा असला पाहिजे व ईशान्येकडील नवीन एनबीएफसी एमएफआयकडे तो किमान रु. २ कोटी असावयास पाहिजे. एनबीएफसी एमएफआय म्हणून वर्गीकृत करावयाच्या विद्यमान एनबीएफसींना ह्या निकषाचे पालन एप्रिल ०१, २०१२ पासून करणे आवश्यक आहे.

[१] एमएफआय क्षेत्रांना येणा-या अडचणी व त्याबाबत ह्या बँकेकडे आलेल्या सादरीकरणांचा विचार करुन, एनबीएफसी एमएफआयबाबतचे ॲसेट वर्गीकरण व तरतुदीचे निकष ह्यांची अंमलबजावणी, एप्रिल ०१, २०१३ पर्यंत पुढे ढकलण्याचे ठरविण्यात आले आहे.

[१] डीएनबीएस.पीडी/सीसी क्र. २६३/०३.१०.०३८/२०११-१२ दि मार्च २०, २०१२ अन्वये स्थापित.

**(ब) प्रुडेंशियल नॉर्म्स**

(अ) भांडवली आवश्यकता

सर्व नवीन एनबीएफसी एमएफआयनी टायर १ व टायर २ भांडवलांचा, कॅपिटल अॅडेक्वसी रेशो, तिच्या एकूण जोखीमभारित अॅसेट्सच्या १५ टक्के एवढा ठेवणे आवश्यक आहे. कोण्त्याही वेळी, एकूण टायर २ भांडवल हे, टायर १ भांडवलाच्या १००% पेक्षा अधिक नसावे. ताळेबंदांवरील अॅसेट्स जोखीम भार आणि ताळेबंदाबाहेरील बाबींसाठीचे क्रेडिट कनवर्शन फॅक्टर्स हे, अ-बँकीय वित्तीय कंपन्या (ठेवी न स्वीकारणा-या व न धारण करणा-या) कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या परिच्छेद १६ मध्ये दिल्यानुसार असावेत.

**टीप :**

(१) एनबीएफसी एमएफआय म्हणून वर्गीकृत करावयाच्या विद्यमान एनबीएफसींपैकी, रु. १०० कोटींपेक्षा कमी अॅसेट साईज असलेल्या एनबीएफसींनी, एप्रिल ०१, २०१२ पासून, ह्या निकषाचे पालन करणे आवश्यक आहे. रु. १०० कोटी व त्यापेक्षा अधिक अॅसेट साईज असलेल्या एनबीएफसींना किमान १५% एवढा सीआरएआर ठेवणे आधीच आवश्यक आहे.

(२) आंध्र प्रदेशातील, २५% पेक्षा अधिक लोन पोर्टफोलिओ असलेल्या एनबीएफसी एमएफआय साठींचा सीआरएआर, फक्त २०११-२०१२ साठीच १२% एवढा असेल. त्यानंतर मात्र त्यांना १५% एवढा सीआरएआर ठेवावा लागेल.

(ब) अॅसेट वर्गीकरण व तरतुदीकरणाचे निकष :

एप्रिल २०१२ पासून सर्व एनबीएफसी एमएफआयना पुढील नॉर्म्सचे पालन करावे लागेल (तोपर्यंत त्यांनी, अ-बँकीय वित्तीय कंपन्या (ठेवी न घेणा-या व न ठेवणा-या) कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, २००७ मध्ये दिलेल्या अॅसेट वर्गीकरण प्रोव्हिजनिंग नॉर्म्सचे पालन करावे).

अॅसेट वर्गीकरणाचे नॉर्म्स

(१) स्टँडर्ड अॅसेट म्हणजे, ज्या अॅसेटच्या बाबतीत मुद्दलाची परतफेड किंवा व्याजाचे प्रदान ह्यासंबंधाने कोणतीही कसुरी दिसून येत नाही व त्याबाबत कोणतीही अडचण दिसून येत नाही तसेच व्यवसायाच्या अनुषंगाने नेहमीपेक्षा अधिक जोखीम असत नाही असा अॅसेट

(२) अकार्यकारी अॅसेट म्हणजे, ९० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक काळ, ज्याच्या बाबतीत व्याज/मुद्दल थकित झालेले असते असा अॅसेट.

तरतुदीकरणाचे नॉर्म्स

कोण्त्याही वेळी, एनबीएफसी एमएफआयद्वारे कर्जाबाबत ठेवावयाची एकूण तरतुद ही पुढीलपैकी अधिक असलेल्यापेक्षा कमी असणार नाही

(अ) थकित कर्ज पोर्टफोलियोच्या १% किंवा (ब) ९० दिवसांपेक्षा अधिक व १८० दिवसांपेक्षा कमी काळ थकित झालेल्या एकूण कर्ज हप्त्यांच्या ५०% आणि १८० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक काळ थकित झालेल्या एकूण कर्ज हप्त्यांच्या १००%

(क) अबँकीय वित्तीय (ठेवी न घेणा-या व न ठेवणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश २००७ मध्ये दिलेल्या (व त्यात दिलेल्या अपवादांनुसार) इतर सर्व तरतुदी एनबीएफसी एमएफआयना लागु होतील.

**(क) इतर विनियम**

**(अ) कर्जाचे मूल्यांकन करणे**

(१) सर्व एनबीएफसी  एमआफआयनी १२% पर्यंत एकूण मार्जिन कॅप ठेवावी. व्याजाची किंमत/मूल्य, थकित कर्जाच्या सरासरी पाक्षिक शिल्लकांवर काढले जावे आणि व्याज उत्पन्न हे, निकषपात्र (क्वालिफायिंग) ॲसेट्सच्या थकित कर्ज पोर्टफोलियोच्या सरासरी पाक्षिक शिल्लकांवर काढले जावे.

(२) वैयक्तिक कर्जावरील व्याज प्रतिवर्ष २६% पेक्षा अधिक असू नये व ते घटती शिल्लक धर्तीवर काढले जावे.

(३) प्रक्रिया आकार हा कर्जाच्या एकूण रकमेच्या १% पेक्षा जास्त असू नये.  हे प्रक्रिया आकार, मार्जिन कॅप किंवा इंटरेस्ट कॅपमध्ये समाविष्ट केले जाऊ नयेत.

(४) एनबीएफसी  एमएफआयनी, कर्जदार व त्याची पत्नी/पती ह्यांचे स्वास्थ्यासाठीचा विमा, ग्रुप, किंवा जनावरे, अयुर्विमा अशा विम्यासंबंधाने केवळ विम्याची प्रत्यक्ष किंमतच वसूल करावी.  वसुल केलेले प्रशासकीय खर्च हे आयआरडीएच्या मार्गदर्शक तत्वानुसार असावेत.

**(ब) कर्ज देण्यामधील उचित आचार**

**(१) व्याजदरांमधील पारदर्शकता**

(अ) कर्जाचे मूल्यांकन करण्यासाठी केवळ तीनच घटक असतील - आकारलेले व्याज, प्रक्रिया आकार व विम्याचा हप्ता (हा त्याबाबतचा प्रशासकीय आकार समाविष्ट आहे)
(ब) उशीरा प्रदान केल्यास त्यासाठी दंड लावला जाऊ नये
(क) एनबीएफसी  एमएफआयने कर्जदाराकडून कोणतीही सुरक्षा ठेव/मार्जिन घेऊ नये
(ड) कर्ज  करारनाम्याचा एक ठरीव फॉर्म असावा
(ई) प्रत्येक एनबीएफसी  एमएफआयने तिच्या कर्जदाराला, पुढील गोष्टी निर्देशित करणारे एक लोन कार्ड द्यावे
(१) आकारलेल्या व्याजाचा परिणामी दर
(२) त्या कर्जाशी संलग्न असलेल्या सर्व अटी व शर्ती
(३) कर्जदाराची सुयोग्य ओळख करुन देणारी माहिती
(४)मिळालेले हप्ते व अंतिम मोचन (डिसचार्ज) ह्यासह सर्व परतफेडीबाबत त्या एनबीएफसी एमएफआयने दिलेल्या पोच-पावत्या
(५) लोन कार्डात केलेल्या सर्व नोंदी भारतीय भाषेत असाव्यात.

(फ) एनबीएफसी  एमएफआयद्वारा आकारण्यात येणारा लागु व्याजदर, तिच्या सर्व कार्यालयांमध्ये तसेच तिने दिलेल्या सर्व साहित्यात व वेबसाईटवही ठळकपणे दिला जावा.

## (२) बहुविध कर्जदान, कर्जाधिक्य व खोटे-कर्जदार

(अ)जॉईंट लायाबिलिटी ग्रुप (जेएलजी)/स्वयंसेवा गट (एसएचजी) चे सभासद नसलेल्या वैय्यक्तिक कर्जदारांना किंवा जेएलजी/एसएचजीच्या सभासदांना एनबीएफसी  एमएफआय कर्ज देऊ शकतात

(ब) कोणताही कर्जदार एकापेक्षा अधिक एसएचजी/जेएलजीचा सभासद होऊ शकत नाही

(क) एकाच कर्जदाराला दोनपेक्षा अधिक एनबीएफसी  एमएफआयनी कर्ज देऊ नये

(ड) कर्ज दिले जाण्यापासून ते पहिला हप्ता भरला जाण्याच्या ठरलेल्या तारखेपर्यंतच्या दरम्यान मोरेटोरियमचा (कर्ज फेड पुढे ढकलण्याचा) एक किमान कालावधी ठेवला पाहिजे.  हा मोरेटोरियम त्या परतफेडीच्या वारंवारतेपेक्षा कमी असू नये.  उदा. - साप्ताहिक परतफेडीच्या बाबतीत, असे मोरेटोरियम एक आठवड्यापेक्षा कमी असू नये.

(ई) विनियमांचे उल्लंघन करुन दिलेल्या कर्जाची वसुली, विद्यमान असलेल्या पूर्वीच्या सर्व कर्जांची संपूर्ण परतफेड होईपर्यंत पुढे ढकलावी.

(फ) कर्जांची मंजुरी व वाटप केवळ एकाच केंद्रीय स्थानी केले जावे व ह्या कार्यात एकापेक्षा अधिक व्यक्तींचा सहभाग असावा.  ह्याशिवाय, वाटपकार्यावर जवळून देखरेख ठेवली जावी.

**(३) वसुलीच्या विना-धाकदपटशा/जबरदस्तीच्या रीती**

- एनबीएफसी-एमएफआयसी, त्यांच्या फील्ड स्टाफ ची भरती, प्रशिक्षण व पर्यवेक्षण ह्यासाठी एक आचार संहिता व प्रणाली तयार केली असल्याची खात्री करून घ्यावी, ह्या आचार संहिते मध्ये, वेळोवेळी सुधारित केलेल्या, दि.२८ सप्टेंबर २००६ च्या परिपत्रक सीसी क्र.८० अन्वये, एनबीएफसी साठी दिलेल्या उचित आचार संहितेवरील मार्गदर्शक तत्वे समाविष्ट असावीत.
- वसुलीचे काम, सर्वसाधारणतः एकाच केंद्रीय ठिकाणावरुन केले जावे. दोन किंवा अधिक प्रसंगी, कर्जदार वसुलीच्या जागी न आल्यासच, फील्ड स्टाफला, कर्जदाराच्या राहत्या घरी किंवा कामाच्या जागी जाऊ देण्याची परवानगी द्यावी.
- एनबीएफसींसाठी वेळोवेळि सुधारुन दिलेले परिपत्रक सीसी क्र. ८० दि.२८ सप्टेंबर २००६ मधील उचित आचार संहितेची इतर घटक तत्वे.

**(क) कॉर्पोरेट गव्हर्नन्स**

एनबीएफसींसाठी कॉर्पोरेट गव्हर्नन्सवरील, सीसी क्र.१८७ दि. जुलै ०१, २०११ चे महापरिपत्रक एनबीएफसी एमएफआयनाही लागु असेल.

**(ड) कार्यक्षमतेमध्ये सुधारणा**

एनबीएफसी  एमएफआयनी त्यांच्या बॅक-ऑफिसमधील कार्यकृतींचे पुनरावलोकन करुन, अधिकत्तर नियंत्रण ठेवण्यासाठी, कार्यरीती सुलभ करण्यासाठी व खर्च कमी करण्यासाठी माहित तंत्रज्ञान व प्रणालींमध्ये गुंतवणुक करावी.

**(ई) इतर**

प्राधान्यता क्षेत्रावरील मार्गदर्शक तत्वांबाबत बँकांना दिल्या गेलेल्या  बँक लोन्स टु मायक्रो फायनान्स इन्स्टिट्युशन्स (एमएफआय)  प्रायोरिटी सेक्टर स्टेटस ह्या शीर्षकाचे, आरबीआयच्या ग्रामीण योजना व ऋण विभागाने दिलेल्या, परिपत्रक क्र. आरपीसीडी.सीओ.प्लान.बीसी.६६/०४.०९.०१/२०१०-११ दि. मे ३, २०११ चा संदर्भ सर्व एनबीएफसींनी घ्यावा.

(५) वरील अटींची पूर्तता करणा-या एनबीएफसींनी, त्यांच्या वर्गीकरणात, एनबीएफसी  एमएफआय असा बदल करुन घेण्यासाठी, ह्या बँकेने दिलेल्या पंजीकरण प्रमाणपत्राच्या (सीओआर) मूळ प्रतीसही, त्या बँकेचे पंजीकृत कार्यालय, आरबीआयच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येते, त्या कार्यालयाकडे जावे.  त्यांच्या विनंतीला दुजोरा म्हणून, मार्च ३१, २०११ रोजी असलेल्या त्यांच्या ॲसेट्सचा (कर्ज) साचा दर्शविणारे त्यांच्या वैधानिक ऑडिटरचे प्रमाणपत्रही सोबत जोडावे.  एनबीएफसी  एमएफआय म्हणून वर्गीकृत करण्यासाठी, केवळ पात्र असलेले ॲसेट्सच समाविष्ट करण्याची जबाबदारी, त्या संबंधित कंपनीचीच असेल.  असा वर्गीकरणामधील बदल, आरबीआयने एनबीएफसी  एमएफआय म्हणून दिलेल्या प्रमाणपत्रात समाविष्ट केला जाईल.

(६) अबँकीय वित्तीय (ठेवी न घेणारी  न ठेवणारी) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००७ च्या परिच्छेद १५ अनुसार, सर्व एनबीएफसींनी,  दर  वर्षी,  मार्च  ३१  अखेर  संपलेल्या  आर्थिक वर्षासाठी, त्या कंपनीच्या स्थितीबाबत, वैधानिक ऑडिटर्सचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.  एनबीएफसी  एमएफआयसाठी, अशा प्रमाणपत्रात, - ह्या परिपत्रकात निर्देशित केलेल्या, एनबीएफसी  एमएफआय म्हणून वर्गीकृत करण्यासाठी आवश्यक त्या सर्व अटी, त्या कंपनीने पूर्ण केल्या आहेत - असे निर्देशित करण्यात यावे.

(७)  ह्या निदेशांचे अनुपालन न केले गेल्यास, ते आरबीआय अधिनियम, १९३४ खाली दंडात्मक तरतुदींसाठी पात्र ठरेल.

(८) एनबीएफसी  एमएफआयच्या विशिष्ट व्यवसायाचा विचार करता, त्यांना, सर्व एनबीएफसींना लागु असलेल्या सर्वसाधारण एफपीसी व्यतिरिक्त, परिपत्रक डीएनबीएस.सीसी.पीडी.क्र.२६६ दि. मार्च २६, २०१२ मधील विशिष्ट मार्गदर्शक तत्वेही लागु आहेत.

जोडपत्र

| क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १ | डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र २६३ / ०३.१०.०३८ /२०११-१२ मार्च २०, २०१२ | मार्च २०, २०१२ |
| २ | डीएनबीएस.सीसी.पीडी.क्र.२६६ | मार्च २६, २०१२ |